# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६०१२६४
२५६०१२६५
ई—मेल: **pldvp@unipune.ac.in**

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ : साफुपुवि/निववि/ 179

दिनांक : ०६/०२/२०१८

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संबंधित संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

**विषय : गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थामधील बिगर आदिवासी व आदिवासी विभागातील शैक्षणिक वर्षे २०१६—१७ मध्ये सौर ऊर्जा उपकरणे बसविण्याचा कार्यवाही अहवाल सादर करणेबाबत.**

महोदय/महोदया,

महाविद्यालय गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत बिगर आदिवासी व आदिवासी विभागातील संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था यांनी शैक्षणिक वर्ष सन २०१६—१७ मध्ये ऑनलाईन पध्दतीने सौर ऊर्जा उपकरणासाठी अर्थसहाय्याकरिता प्रस्ताव दाखल केलेले होते. सदरील प्रस्तावांस या कार्यालयाच्या परिपत्रक क्र.साफुपुवि/निववि/४२१, दिनांक १ मार्च, २०१७ नुसार मान्यता देण्यात आलेली होती.

सदरील महाविद्यालये/संस्थांनी सौर ऊर्जा उपकरणे खरेदीसाठी मंजूर अर्थसहाय्यामधून सौर ऊर्जा उपकरणे बसविण्यासाठी वित्त व लेखा कार्यालयाकडून उचल रक्कम रुपये. २,५०,०००/— (रूपये अडीच लाख) घेतलेले आहेत व सौर ऊर्जा उपकरणे बसविण्याची कार्यवाही पूर्ण केलेली आहे अशा संबंधित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थानी त्याबाबतची माहिती आंतरशास्त्र ऊर्जा अभ्यासप्रणाली याविभागास द्यावी व त्यानंतर आंतरशास्त्र ऊर्जा अभ्यासप्रणाली विभागाने सौर ऊर्जा उपकरणे बसविल्याबाबतचा दिलेला अहवाल या विभागास त्वरीत सादर करावा. त्याअनुषंगाने संबंधित महाविद्यालय/संस्थांना उर्वरित अर्थसहाय्य अदा करणे सोयीचे होईल.

उपकुलसचिव
नियोजन व विकास